ISSN : 2278 – 5639
Global Online Electronic International Interdisciplinary Research Journal (GOEIIRJ)
{ Bi-Monthly} Volume-I, Issue-IV December 2012

# नाशिक जिल्ह्यातील आदिवासी विवाहाची वैशिष्ट्ये

**प्राध्या. संजय टी. शेलार,**
**इतिहास विभाग,**
**एम्. एस्. जी. महाविद्यालय,**
**मालेगाव, जि. नाशिक.**

***सारांश :***

*नागरी समाजात विवाहसंस्थेला अनन्यसाधारण महत्व आहे. हा समाजात महत्त्वाचा संस्कार मानला जातो. त्यासंबंधी समाजाने काही महत्वपूर्ण नियम केलेले आहेत.*

**मुख्य संज्ञा : आदिवासी समाजातील विवाहसंस्था**

**प्रस्तावना :**

नागरी समाजाप्रमाणेच आदिवासी समाजातही विवाहसंस्थेला महत्त्वपूर्ण स्थान आहे. कोणी कोणाशी विवाह करावा, केव्हा करावा इत्यादी विवाहाशी संबंधित अनेक नियम आदिवासी समाजात आहेत. या विवाहविषयक नियमांचे अत्यंत काटेकोरपणे पालन ते करीत असतात. आदिवासी समाजात विवाहाची पुढील वैशिष्ट्ये आढळून येतात.

1. विवाहाची अपरिहार्यताः प्रत्येक स्त्री – पुरुष लैंगिक समागमाशिवाय राहू शकत नाही. त्यासाठी विवाह हा एकमेव समाजमान्य मार्ग आहे. इतर आदिवासी जमातींप्रमाणेच कोकणा जमातीत आदिवासी व्यक्तिचा मृत्यू झाल्यास त्या व्यक्तिचा आत्मा भूत, खैस किंवा पिशाच्च रूपात इतरत्र वावरत असतो अशी श्रद्धा आहे. म्हणूनच मृत्यूनंतर सद्‌गती मिळण्यासाठी कोकणा जमातीत विवाह ही अपरिहार्य बाब मानली जाते.[1]
2. कुटुंबांना एकत्र आणण्याचा दुवाः विवाहामुळे दोन व्यक्ती जशा एकत्र येतात तसेच दोन कुटुंब, दोन गाव एकत्र आणण्याचे महत्वपूर्ण कार्यही विवाहामुळे शक्य होते. यामुळे सामाजिक ऐक्य निर्माण होण्यास मदत होते.
3. बालविवाहाचा अभाव भारतातील संथाल, मुंडा या आदिवासी जमाती वगळता इतर बहुतेक आदिवासी जमातींमध्ये बालविवाहाची प्रथा आढळत नाही. प्रौढ विवाहाची प्रथा सार्वत्रिक असल्याचे आढळून येते.

4. विवाहाचे नियमः विवाहाचे वय, जोडीदाराची निवड इत्यादी बाबीशी संबंधित नियम आदिवासी समाजात आहेत. वर हा वधूपेक्षा वयाने मोठा असावा असे मानले जाते. घटस्फोट ठराविक पद्धतीने घेण्याची प्रथा इतर समाजाप्रमाणे कोकणा समाजातही आहे. विवाह नियमांचा भंग करणाऱ्या व्यक्तिला समाज शासन करतो.
5. विवाहपूर्व व विवाहबाह्य संबंधः 'विवाहपूर्व लैंगिक संबंधात आदिवासी लोक फारसे संवेदनशील नसतात' असे म्हटले जात असले तरी यांच्यात लैंगिक स्वैराचार आढळून येत नाहीत. माडिया, गोंड जमातींमधये गोटूळ घरात युवक – युवतींना एकत्रित राहण्याची अनुमती आहे. मध्य भारतातील आदिवासी जमातींमध्ये तसेच अपवादात्मक कोकणा जमातीतही विवाहपूर्व संबंधातून स्त्रीला गर्भावस्था प्राप्त झाली तर ते संबंध अधिक गंभीर मानले जातात. विवाहानंतर स्त्रीने आपल्या पतीशी एकनिष्ठ रहावे अशी अपेक्षा या जमातीची आहे. या वरील सर्व वैशिष्ट्यांवरून आदिवासी समाजातील विवाह संस्थेचे स्वरुप स्पष्ट होते.[2]

**आदिवासींमधील विवाह जोडीदार प्राप्त करण्याच्या पद्धती :**

आदिवासी समाजातील व्यक्तिने कोणत्या वयात लग्न करावे ? कोणाशी लग्न करावे ? या बाबतीत काही नियम आहेत. तसेच वधू कोणत्या मार्गांनी मिळवावी यासंबंधी देखील समाजाचे काही नियम आहेत. या नियमांचे पालन व्हावे अशीच समाजाची अपेक्षा असते. विवाह हा दोन समाजांना जोडणारा दुवा आहे. विवाहामुळे विवाहित दोन व्यक्ती एकत्र येत नसून दोन कुटुंबे एकत्र येतात. आदिवासी समाजात विवाह हा एक धार्मिक संस्कार आहे. तो एक उत्सव आहे असेच ते मानतात.[3]

आदिवासी समाजात वधू प्राप्त करण्यासाठी वधूपित्याला मोबदला देण्याची प्रथा आहे. त्याला ते 'देज' असे म्हणतात. आदिवासी जमातींमध्ये वधूमूल्य देऊन विवाह केले जातात. आदिवासी कोकणा जमातीतही पैसा, धान्य या स्वरूपात वधूमूल्य देण्याची प्रथा आहे. खर्चात पडणाऱ्या वधू कुटुबाला हातभार लावण्याच्या हेतूने ही मदत केली जाते. एखाद्या वराच्या घरची आर्थिक परिस्थिती दारिद्याची असेल आणि वधू कुटुंब जर ऐपतदार असेल अशा वेळी वराला धान्य, पैशाच्या स्वरुपात मदत करण्यासारखी उदाहरणे आढळतात. दोन लोकांत फजिती व्हायला नको हा मानवतावादी दृष्टिकोन नजरेपुढे ठेऊन ही मदत केली जाते.[4]

अशा प्रकारे वधूमूल्य देऊन आणि वधूमूल्य न देता विवाह करण्याची पद्धत आदिवासी समाजात आढळून येते. विवाह जोडीदार प्राप्त करण्याचे पुढील प्रकार आदिवासी समाजात निर्माण झाले आहेत.

1. **क्रय विवाह :**

वधूमूल्य म्हणजेच एक प्रकारचा दहेज, हुंडा. वधूच्या पालनपोषणासाठी पित्याने केलेल्या खर्चाची

भरपाई दिल्याने वधूचा मान कमी होतो. वधू जवळ गुणांची कमतरता असल्याने वधूमूल्य दिले जाते असे. अशी टिप्पणी सुधारित भागातील काही जाणकारांकडून केली जाते. परंतु ते खरे नाही. उलट निराधार होणाऱ्या, कर्जबाजारी होणाऱ्या वधूपित्याला मदतीचा हात देणे व वधूपित्याचे होणारे आर्थिक नुकसान टाळण्यासाठी वधूमूल्य देण्यात येते. हा दृष्टिकोन या प्रथेमागे आहे.[5]

इतर जमातींप्रमाणेच आदिवासी कोकणा जमातीत देखील लग्न हे वधू घरी लावले जाते. त्यावेळी येणाऱ्या खर्चाला हातभार लावण्याच्या हेतूने आणि वधू पित्याचे होणारे नुकसान टाळण्याच्या हेतूने वधूमूल्य दिले जाते. दोन कुटुंबातील आर्थिक सहकार्य हे देखील वधूमूल्याच्या प्रथेचे एक महत्वपूर्ण कारण आहे. यात व्यापारीवृत्ती नसते. प्रेम भावनेवर आधारलेली ही देवाण – घेवाण आहे. किमान कोकणा जमातीची तरी अशीच धारणा आहे.

**2. सेवा विवाह :**

आर्थिक परिस्थिती हालाखीची असलेल्या जमातीमधील प्रत्येकालाच वधूमूल्य देणे शक्य होत नाही. परिणामी वधूपित्याच्या घरी राहून त्यांच्या घरची कामे करणे, साऱ्यांची मर्जी राखून त्यांची सेवा, चाकरी करून वधू प्राप्त करण्याची पद्धत काही आदिवासी जमातींमध्ये आढळते. सेवाकाळ संपल्यानंतर तिच्या वडिलांच्या संमतीने विवाह होऊन स्वतंत्र संसार थाटता येतो. महाराष्ट्र, उत्तर प्रदेशातील काही जमातींमध्ये ही प्रथा रूढ आहे. पलियन या जमातीत हा सेवा काळ 6 महिने ते 1 वर्ष एवढा असतो. तर गोंड जमातीत 2 ते 5 वर्षाचा असतो. तर कोकणा जमातीत हा सेवाकाळ 2 ते 4 वर्षाचा असतो. गुराखी किंवा घरगडी यांच्या साठीचा सेवाकाळ 5 ते 7 वर्षाचा असतो.[6]

**3. घरजावई :**

मुलगी शारीरिक दृष्ट्या अपंग असेल किंवा घरातील सर्व अपत्य मुलीच असतील किंवा मुलगा व्याधिग्रस्त, अपंग असेल अशावेळी घरातील एखाद्या मुलीस घरजावई ठेवण्याची पद्धत कोकणा जमातीत आहे. म्हातारपणाचा आधार आणि वारस या हेतूनेच या पद्धतीला समाजाने मान्यता दिलेली आहे. मुंबई जवळील सोनकोळी जमातीत, यवतमाळ जिल्ह्यातील कोलाम जमातीत आणि नाशिक व ठाणे जिल्ह्यातील 'कोकणा' जमातीत घरजावई ठेवण्याची पद्धत अस्तित्वात आहे.

**4. विनिमय विवाह :**

रॉबर्ट लोवी यांच्या मते– 'कोणत्याही प्रकारचे नुकसान नसलेला हा विवाह प्रकार आहे.' या पद्धतीला एका कुटुंबातील मुलगी दुसऱ्या कुटुंबात दिली जाते आणि त्याच कुटुंबातील मुलगी सून म्हणून घरात आणली जाते. अशा प्रकारे दोन कुटुंबातील मुलींची ही अदलाबदल असते. यालाच विनियम किंवा साटेलोटे विवाह असे ही म्हणतात.

केरळ मधील उल्लतन, विश्वान, उरली, कुरिचियन तसेच आदिवासी कोकणा जमातीतही ही पद्धत पूर्वापार रूढ आहे.

**5. अपहरण विवाह किंवा वधूहरण विवाह :**

मॅकलेनन या मानसशास्त्रज्ञांच्या मते, वधू प्राप्त करण्याची ही सर्वात जुनी अथवा प्राचीन अशी पद्धती आहे. या पद्धतीने वधू प्राप्त करताना वधू आणि वधूपिता यांच्या इच्छेचा विचार केला जात नाही. वर – वधूचे तिच्या मनाविरूद्ध जबरदस्तीने अपहरण करतो. यामुळे रुढीप्रमाणे वधूपित्याला वधूमूल्य दिले जात नाही. वधू प्राप्त करण्याची ही पद्धत समाजमान्य नसूनही ती टिकून आहे. भारतात हो, नागा, बोंदो, गोंड, भिल्ल, वारली, कोकणा इत्यादी आदिवासी जमातीत अपहरण पद्धतीने वधू प्राप्त करण्याची प्रथा आहे. स्वतंत्र भारतात भारतीय दंडविधानाप्रमाणे वधू पळवून नेणे हा शिक्षापात्र गुन्हा समजला जातो. यामुळेच या पद्धतीला आळा बसत चालला आहे.[7]

**6. घरघुशी, हठागमन किंवा आगांतुकी विवाह :**

अपहरण विवाहाच्या अगदी विरूद्ध प्रकार म्हणजे घरघुशी विवाह होय. अपहरण विवाहात पुरूष पुढाकार घेतो तर घरघुशी विवाहात स्त्रीच पुढाकार घेते. या पकारात बरेचदा दोघांचेही एकमेकांवर प्रेम असते. परंतु त्या पुरुषाची टाळाटाळ किंवा घरच्यांचा असलेला विरोध न जुमानता ती स्त्री बळजबरीने घरात घुसते. अपमान, त्रास सहन करूनही ती आपला निश्चय सोडत नाही. अखेर तिचा सून म्हणून स्वीकार होतो.

भारतातील कमार, हो, मुंडा, संथाल जमातीमध्ये ही प्रथा आहे. महाराष्ट्रातील वारली, कोरकू तसेच कोकणा जमातीतही ही प्रथा अस्तित्वात आहे.

**7. परिक्षा काल विवाह :**

या विवाह प्रकारात प्रत्यक्ष विवाह होण्यापूर्वी विवाह इच्छूक तरुण व तरुणी परस्परांचे मनोमिलन होण्याच्या हेतूने राजरोसपणे काही काळ एकत्र राहतात. दोघांनाही अनुरूप वाटले तरच पुढे त्यांचा विवाह होतो. अन्यथा तरुणीच्या घरच्यांना नुकसान भरपाई दिली जाते. आसाम मधील कुकी व दारलुंग या आदिवासी जमातीत ही पद्धत रूढ आहे.

**8. परिक्षा विवाह :**

काही आदिवासी जमातीत मुलाचे चातुर्य व त्याचे शारीरिक बल पाहून त्याला मुलगी दिली जाते. आदिवासींचे जीवन अतिशय कष्टाचे आहे. त्यामुळे मुलांमध्ये शारीरिक शक्ती, साहस, धैर्य इत्यादी गुण आहेत की नाहीत हे पाहण्यासाठी परीक्षा घेतली जाते. तरुणाजवळ हे गुण असतील तरच त्याला विवाह करण्यास संमत दिली जाते. गुजरात मधील भिल्ल व कोलम जमातीत ही पद्धत प्रचलित आहे.[8]

**9. सहपलायन विवाह :**

या विवाह प्रकारात बरेचदा घरातून विवाहाला विरोध असल्यामुळे घरच्यांचे व समाजाचे कोणतेही निर्बंध न मानता स्वखुषीने संमतीने गावातून पळून जाऊन तरुण – तरुणी विवाह करतात. याला सहपलायन विवाह म्हणतात.

छोटा नागपूर भागातील 'हो' जमात नाशिक भागातील भिल्ल, वारली तसेच कोकणा जमातीतही असे 'राजी खुशी' विवाह होऊ लागले आहेत. चित्रपट, दूरदर्शन मालिकांचे अनुकरणामुळे दिवसेंदिवस त्यांची संख्या वाढतच चालली आहे.[9]

**10. पारंपरिक विवाह :**

माडिया, गोंड यांसह इतर काही जमातीत गोटूल व युवागृहात एकत्र राहणाऱ्या तरुण – तरुणीत प्रेम भावना निर्माण होऊन त्यांना विवाह करावा असे वाटणे स्वाभाविकच आहे. एकमेकांच्या पसंतीने होणाऱ्या या विवाहाला पारंपारिक विवाह असे म्हणतात.

**आदिवासी विवाहाचे प्रकार :**

विवाहात सहभागी होणाऱ्या स्त्री – पुरुषांच्या संख्येवर आधारित 1. एक विवाह व 2. बहुविवाह असे विवाहाचे ठळक दोन प्रकार आदिवासी समाजामध्ये आढळून येतात.

**1. एकविवाह :**

जेव्हा एका पुरुषाचा एका स्त्रीशी विवाह होतो, तेव्हा त्या विवाह प्रकारास एकविवाह असे म्हणतात. विवाहाचा हा प्रकार सर्वमान्य असून तो सर्वोत्तम मानला जातो. बहुतेक आदिवासी समाजात एकविवाहाची प्रथा प्रचलित आहे. अंदमान व निकोबार बेटातील कोळ व कुची तर लुझान प्रदेशातील इगोरेट या जमातीप्रमाणेच आदिवासी कोकणा जमातीत देखील बहुविवाह व अंगवस्त्र ठेवण्यावर समाजाचे बरेच नियंत्रण आहे.[10]

**2. बहुविवाह** : बहुविवाहाचे दोन ठळक उपप्रकार पडतात.

**1. बहुपतित्व :**

या विवाहाप्रकारात एक स्त्री एकापेक्षा अधिक पुरुषांशी विवाह करते. ही प्रथा त्याच समाजात अस्तित्वात आहे, जेथे निसर्गच मानवाचा शत्रू असतो. खाद्यान्नाचा अभाव असतो. परिणामी तेथे पुरुषांची संख्या अधिक असते. हे एकमेव कारण बहुपतित्व या प्रकाराचे आहे. या विवाहाचे दोन उपप्रकार आहेत.

**अ. भातृ – बहुपतित्व :**

या प्रकारात सर्व भाऊ एकाच स्त्रीचे पती असतात. या प्रकारासंबंधी वेस्टर मार्क म्हणतात, जेव्हा

एखादा मुलगा एका स्त्रीशी विवाह करतो तेव्हा ती स्त्री त्याचवेळी त्याच्या इतर भावांची पत्नी होते. भारतात डेहराडून आणि जयपूर जिल्ह्यातील खासा जमात, निलगिरी पर्वतावरील तोडा जमात, कोटा जमात यांच्यात ही विवाह पद्धत अस्तित्वात आहे.[11]

**ब. भातृ बहिपतित्व :**

या प्रकारात एक स्त्री अनेक पुरुषांशी विवाह करते. परंतु हे पुरुष परस्परांचे भाऊ नसतात. या उपप्रकाराच्या विवाहात स्त्री पाळीपाळीने एकेका पतिकडे जाऊन राहते किंवा ते सर्व तिच्या समवेत एकत्र राहतात. दक्षिण भारतातील नायर जमातीत ही एक प्रथा आढळते. नायर ही मातृसत्ताक जमात आहे. स्त्रियांची संख्या कमी या कारणामुळे बहुपतित्वाची प्रथा या जमातीत आढळून येते.[12]

**2. बहुपत्नीत्व :**

या विवाह प्रकारात एक पुरुष एकापेक्षा अधिक स्त्रियांशी विवाह करतो. भारतात अगदी प्राचीन काळापासून ही प्रथा अस्तित्वात असल्याचे दिसून येते. इतर समाजामध्ये एकापेक्षा अधिक स्त्रियांशी विवाह करणे हे सामाजिक प्रतिष्ठेचे प्रतीक, श्रेष्ठत्वाच्या भावनेचे द्योतक मानले जाते. मात्र आर्थिक दृष्ट्या दुर्बल असलेल्या आदिवासी समाजात पत्नीपासून पुत्रप्राप्ती नसते, पत्नी आजारी, आर्थिक क्रियांमध्ये सहभाग यासारख्या काही विशिष्ट कारणांसाठी पुरुषांनी दुसरा विवाह करणे हे समाजमान्य समजले जाते. भारतात बैगा, नागा, गारो, कोलाम, ठाकूर, भिल्ल, गोंड, सोनकोळी या जमातींप्रमाणेच कोकणा जमातीतही बहुपत्नीत्वाची प्रथा अस्तित्वात आहे. कायद्याने बहुपत्नीत्वास मान्यता नाकारली असली तरी आजही वरील कारणाने बऱ्यापैकी बहुपत्नी विवाह होतांना आढळतात.

**3. समूह विवाह :**

या प्रकारात दोनपेक्षा अधिक असणाऱ्या पुरुषांचा गट दोनपेक्षा अधिक असणाऱ्या स्त्रियांच्या गटाशी विवाह करतो म्हणूनच या प्रकारांना समूह विवाह असे म्हणतात. ऑस्ट्रेलियातील डिअरी, ब्राझीलमधील – कैननांग आणि भारतातील – तोडा या आदिवासी जमातीमधील काही लोकांमध्ये हा विवाह प्रकार आढळतो.[13]

**संदर्भ ग्रंथसूची :**

1. जोशी तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री, 'मराठी विश्वकोश खंड–3' म.रा.सा. संस्कृती मंडळ : प्रथम आवृत्ती – 1976 : पृष्ठ – 955
2. जोशी तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री, 'मराठी विश्वकोश खंड – 2' म.रा.सा.संस्कृती मंडळ : प्रथम आवृत्ती – 1976 : पृष्ठ – 29
3. जोशी पं. महादेवशास्त्री, 'भारतीय संस्कृती कोश खंड–1' प्रथम आवृत्ती – 1962 : पृष्ठ – 428

4. जोशी पं. महादेवशास्त्री, 'भारतीय संस्कृती कोश खंड – 1' प्रथम आवृत्ती – 1962 : पृष्ठ – 430
5. जोशी तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री, 'मराठी विश्वकोश खंड–8 'म.रा.सा. संस्कृती मंडळ : प्रथम आवृत्ती – 1976 : पृष्ठ – 45
6. एन. एल. जाधव, 'वनवासी राजा', राहुल बुक सेंटर, नाशिक : पृष्ठ–9
7. जोशी तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री, 'मराठी विश्वकोश खंड – 6' म.रा.सा. संस्कृती मंडळ : प्रथम आवृत्ती – 1977 : पृष्ठ–413
8. प्रा. रा. ज. लोटे 'आदिवासी समाजाचे समाजशास्त्र' पिंपळापुरे ॲण्ड कं. पब्लिशर्स नागपूर : प्रथमावृत्ती – जुलै 2004 : पृष्ठ – 6
9. जोशी तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री, 'मराठी विश्वकोश खंड – 6' म.रा.सा. संस्कृती मंडळ : प्रथम आवृत्ती – 1977 : पृष्ठ – 242
10. डॉ. गोविंद गारे, 'महाराष्ट्रातील आदिवासी जमाती' कॉन्टिनेंटल प्रकाशन पुणे : द्वितीय आवृत्ती–2002 : पृष्ठ – 11
11. प्रा. रा. ज. लोटे, 'आदिवासी समाजाचे समाजशास्त्र' पिंपळापुरे ॲण्ड कं. पब्लिशर्स नागपूर : प्रथमावृत्ती – जुलै 2004 : पृष्ठ – 16
12. विलास संगवे, 'आदिवासींचे सामाजिक जीवन', पॉप्युलर प्रकाशन मुंबई : द्वितीय आवृत्ती – 1978 : पृष्ठ – 77
13. प्रा. रा. ज. लोटे, 'आदिवासी समाजाचे समाजशास्त्र' पिंपळापुरे ॲण्ड कं. पब्लिशर्स नागपूर : प्रथमावृत्ती – जुलै 2004 : पृष्ठ – 18